# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 27.09.2024** **वार – शुक्रवार**

---

**मोहोळ पत्रकार परिषद**

पुण्यातील जिल्हा न्यायालय ते स्वारगेट या भुयारी मेट्रो मार्गाचा लोकार्पण तर स्वारगेट ते कात्रज या मेट्रो मार्गाचे भूमिपूजन आणि पुण्यातील विकास कामांचं लोकार्पण येत्या रविवारी दुपारी बारा वाजता पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दुरस्थ पद्धतीनं होणार आहे. अशी माहिती केंद्रीय हवाई वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी पत्रकार परिषदेत दिली. तसचं सोलापूर विमानतळाचे लोकार्पण पंतप्रधानांच्या हस्ते दुरस्थ पद्धतीनं होणार आहे. या कार्यक्रमाला राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि अजित पवार हे पुण्यात प्रत्यक्ष उपस्थित राहणार आहेत. लोकार्पण सोहळ्यानंतर स्वारगेट इथं गणेश कलाक्रीडा रंगमंच येथे जाहीर सभा होणार आहे असं मोहोळ यांनी यावेळी सांगितलं.

दरम्यान स्वारगेट ते शिवाजीनगर न्यायालय मेट्रो मार्गिका अनेक दिवसांपासून तयार असूनही पंतप्रधानांच्या हस्ते करण्याच्या हट्टापायी लोकार्पण सोहळा पुढे ढकलणं हा समस्त पुणेकरांचा अपमान आहे अशी टीका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे पुणे शहराध्यक्ष प्रशांत जगताप यांनी केली आहे. तसंच महाविकास आघाडीच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांच्या हस्ते फीत कापून या मेट्रो मार्गीकेचे उद्घाटन करण्यात आल्याचा आमच्या वार्ताहरानं दिलेल्या बातमीत म्हटलं आहे.

**बारणे नियुक्ती**

पुण्यातील मावळ लोकसभा मतदार संघाचे खासदार श्रीरंग बारणे यांची केंद्र सरकारच्या ऊर्जा विभागाच्या स्थायी समिती अध्यक्षपदी निवड झाली आहे त्याचबरोबर केंद्रीय राजभाषा समितीच्या संयोजकपदाची जबाबदारी सुद्धा त्यांच्याकडे सोपवण्यात आली आहे. खासदार बारणे हे तिसऱ्यांदा लोकसभेवर निवडून गेले असून गेल्या दहा वर्षात त्यांना केंद्र शासनाच्या विविध समित्यांवर काम करण्याचा अनुभव आहे.

**सांडपाणी**

पुणे जिल्हा परिषदेनं जिल्ह्यातील एकंदर 189 गावांमध्ये सांडपाणी प्रकल्प राबविण्याचं ठरवलं असून त्यासाठी साधारण 26 कोटी 23 लाख रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. या प्रकल्पांपैकी सध्या जिल्ह्यातील 10 गावांमध्ये प्रकल्प राबवण्यात येत आहे. जिल्हा परिषदेसह पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरणानं सुद्धा काही गावांमध्ये सांडपाणी प्रकल्प राबवणं प्रस्तावित केलं असल्याची माहिती पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी संतोष पाटील यांनी दिली.

**आरोग्य वरधिनी केंद्र**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या सांगवी रुग्णालयाच्या अंतर्गत फुगेवाडी इथं आरोग्यवर्धिनी केंद्र उभारण्यात आलं आहे. या केंद्राचं उद्घाटन अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या हस्ते करण्यात आलं. या आरोग्यवर्धिनी केंद्रामध्ये एकूण 7 कक्ष उभारण्यात आले आहेत. या केंद्राद्वारे गर्भधारणा आणि बाळंतिणीची काळजी, नवजात

अर्भकांची काळजी, बालपण आणि पौगंडावस्थेतील आरोग्य, संसर्गजन्य रोगांचं व्यवस्थापन, विविध आरोग्य कार्यक्रम, नेत्ररोग आणि आपत्कालीन वैद्यकीय सेवा अशा विविध सेवा पुरविण्यात येणार आहेत.

**पथ विक्रेता निवडणूक**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कार्यक्षेत्रातील शहर पथ विक्रेता समितीची निवडणूक या वर्षी होणार असून त्याअनुषंगानं सर्वसाधारण गटासाठी 3 जागा, अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागास वर्ग, अल्पसंख्यांक आणि विकलांग गट अशा एकूण 8 जागांसाठी ही निवडणूक होणार आहे. त्यासाठी सोडत काढुन 2 जागांसाठी महिला आरक्षण सोडत घेण्यात आली तर सर्वसाधारण गटातील 3 जागांमधून 1 जागा महिलांसाठी राखीव करण्यात आली.

**सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हज**

पर्यावरण क्षेत्रात काम करणारी सस्टेनेबिलिटी इनिशिएटिव्हज या सामाजिक संस्थेच्या माध्यमातून प्रीलव्हड इको हाट या उपक्रमाची सुरवात पुण्यातील नामवंत व्हीके ग्रुपच्या कर्मचारांनी केली. या उपक्रमाद्वारे आपल्याकडील वापरात नसलेल्या परंतु इतरांना वापरण्या योग्य असलेल्या वस्तू या प्रदर्शनामध्ये ठेवल्या जातात. त्यामुळे वापरलेल्या उत्पादनांची, कपड्यांची अदलाबदल, विक्री आणि दान एकाच व्यासपीठावर होणं शक्य होतं. सेनापती बापट रस्त्यावरील व्हीके ग्रुपच्या कार्यालयात दर महिन्याच्या चौथ्या सोमवार, मंगळवार आणि बुधवारी या वस्तू प्रदर्शित केल्या जातात. या उपक्रमास खूप चांगला प्रतिसाद मिळत आहे.

**'लँडस्केप अँड लिजेंड्स**

जागतिक पर्यटन दिनानिमित्त गेट सेट गो हॉलीडेजच्या वतीनं तीन दिवसीय 'लँडस्केप अँड लिजेंड्स: ए जपानी कल्चर मोझॅक' या प्रदर्शनाचं आयोजन करण्यात आलं आहे. जपानी कला, संस्कृती आणि कारागिरीचा त्रिवेणी संगम असलेले हे प्रदर्शन कोथरूड इथल्या यशवंतराव चव्हाण कला दालनात येत्या रविवारपर्यंत सकाळी 11 ते रात्री 8 या वेळेत सर्वांसाठी विनामूल्य खुलं असणार आहे.

**पूर परिस्थिति अहवाल**

पुण्यातील पूरपरिस्थिती उद्भवलेल्या भागांची पाहणी करून उपाययोजना सुचवण्यासाठी नेमलेल्या समितीचा अहवाल महापालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्याची मागणी सजग नागरिक मंचाचे विवेक वेलणकर यांनी महापालिका आयुक्त डॉक्टर राजेंद्र भोसले यांच्याकडे केली आहे.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज सकाळपासून ढगाळ हवामान असून अधून मधून पावसाच्या हलक्या सरी पडत आहेत. कमाल तापमान 27 तर किमान तापमान 22 पूर्णांक 4 अंश सेल्सिअस इतका नोंदवलं गेलं. उद्यासुद्धा हवामानात फारसा बदल संभवत नसल्याचा अंदाज हवामान विभागाकडून वर्तवण्यात आला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**